महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ २५ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## आमदारांची हाणामारी; वादग्रस्त वक्तव्ये ....

# मंत्रिमंडळात फेरबदलाचे संकेत ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या वर्षी झालेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमतासह महायुती सरकार सत्तेत आलं होतं. तेव्हापासून सरकारमधील वाचाळवीर मंत्र्यांची वादग्रस्त विधानं, हाणामारी, आक्षेपार्ह टीकाटिप्पणी यामुळे महायुतीची मोठ्या प्रमाणात नाचक्की होताना दिसून येत आहे. यातच पावसाळी अधिवेशनात संजय गायकवाड यांची कॅंटिन कंत्राटदारांना मारहाण, पडळकर विरुद्ध आव्हाड वाद, कृषिमंत्री कोकाटेंचा सभागृहातच रमी खेळतानाचा व्हिडिओ या अनेक प्रकरणांमुळे सरकारवर टीकेची झोड उठवली जात आहे. याचदरम्यान, महायुतीच्या गोटातून आता एक सर्वात मोठी अपडेट समोर येत आहे.

## मुख्यमंत्री घेणार निर्णय?

माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे नेते धर्मरावबाबा आत्राम यांनी आता गुरुवारी (ता.24) मंत्रिमंडळात मोठे फेरबदलाचे संकेत दिले आहेत. त्यांनी राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर हे मोठं विधान केलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धर्मरावबाबा आत्राम यांनी मंत्रिमंडळातील फेरबदलावर प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी 100 दिवसांचा कार्यक्रम दिला होता, त्यानुसार मंत्र्यांच्या कामाचं ऑडिट झालं आहे. त्या ऑडिटमध्ये कोण मंत्री कसं काम करतो, काय करतो याचं ऑडिट पूर्ण झालं आहे.

त्यानुसार ऑडिटमध्ये फेल झालेल्या मंत्र्यांमध्ये बदल होणार असल्याचे सूतोवाच धर्मरावबाबा आत्राम यांनी दिले आहेत. त्यांनी येत्या काही दिवसांत मंत्रिमंडळात नवीन चेहरे दिसणार असून खांदेपालट होईल. काही मंत्र्यांना डच्चू मिळण्याची शक्यता वर्तवली आहे. या त्यांच्या विधानाला राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरील आरोपांची पार्श्वभूमीवर आहे.

पावसाळी अधिवेशनात भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस जितेंद्र आव्हाड यांच्यातही जुंपली होती. एकमेकांवर खालच्या भाषेत टीका करताना धमकावणं आणि हाणामारीपर्यंत हे प्रकरण पोहचलं होतं. यानंतर विधानसभा अध्यक्षांनीही दोन्ही नेत्यांना तंबी दिली होती.

यावरही भाष्य करताना आत्राम म्हणाले, महायुती सरकारच्या मंत्रिमंडळात बदल होईल, असं वातावरण सध्या दिसत आहे. मंत्रिमंडळात काही बदल होतील, कारण एनर्जी असलेले मंत्री हवे, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना परफॉर्मन्स हवा असल्याचंही आत्राम यांनी सांगितलं.

आत्राम म्हणाले, मंत्री असताना जबाबदारी असते, कोड ऑफ कंडक्ट असतात. तसं वागायला हवं. मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार निर्णय



घेतील, असंही त्यांनी सांगितलं आहे. याचदरम्यान, त्यांनी कोकाटेंच्या तुलनेत तरुण नेता, माझ्या कार्यशैलीनुसार माझं वय 30-35 आहे. नवीन मंत्री असताना काही शिकायचं असतं, असं त्यांनी कोकाटे डिवचलं.

आपण पाचवेळा आमदार राहिलो, मंत्री राहिलो, चांगल्या शाळेत शिकलो. आम्हाला माहित आहे. कसं वागायचं. मानसन्मान कसा ठेवायचा, आम्हाला माहित आहे. मंत्री असताना जबाबदारी असते, कोड ऑफ कंडक्ट असतात. तसं प्रत्येकानं वागायला हवं असा सल्लाही आत्राम यांनी कोकाटेंना दिला.

स्थानिक स्वराज संस्थेच्या आधीच महायुती आपल्या पदाधिकारी आणि आमदारांना मोठं गिफ्ट देणार आहे. महायुतीमध्ये विधानसभा निवडणुकीपासून रखडलेला महामंडळ जागा वाटपाचा तिढा अखेर सुटल्याची माहिती आहे. महामंडळच्या जागावाटप फॉर्म्युल्यानुसार भाजपच्या वाट्याला 44 जागा, एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या वाट्याला 33 तर, अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला 23 जागा मिळणार आहे. त्यामुळे मंत्रिपदाची संधी हुकलेल्या आमदारांची नाराजी महामंडळाचे अध्यक्षपद देऊन दूर करण्यात येणार असल्याची माहिती आहे.

---

**थोडक्यात महत्वाचे**

## पार्किंगच्या वादातून ठाण्यात तलवारीने हल्ला

### शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यासह दोघांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - पार्किंगच्या वादातून अजय देवरस (२४) या तरुणावर तलवारीने हल्ला करणाऱ्या शिवसेना शिंदे गटाच्या माजी उपशाखाप्रमुख आकाश भालेराव उर्फ बाडी (२२, रा. साठेनगार, वागळे इस्टेट, ठाणे) आणि सुरज हजारे उर्फ सूर्या (२४, रा. साठेनगर, ठाणे) या दोघांना वागळे इस्टेट पोलिसांनी अटक केली आहे. दोघांनाही दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश ठाणे न्यायालयाने बुधवारी दिले आहेत. दरम्यान, शिवसेनेतून त्याच्यावर कारवाई केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. याप्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर आकाश आणि सूरज या दोघांनाही पोलिसांनी मंगळवारी रात्री अटक केली. दरम्यान, या हल्लयाचा व्हिडिओ देखील सोशल मिडियावर चांगलाच व्हायरल झाला होता.

### मुंबई बॉम्बस्फोट प्रकरण

## निकालाला सुप्रीम कोर्टाची स्थगिती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

२००६ साली मुंबईत झालेल्या भीषण साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. या निर्णयाविरोधात महाराष्ट्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल केली होती. गुरुवारी (२४ जुलै) या याचिकेवर झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली आहे.

**आरोपी तुरुंगाबाहेरच राहणार -**

सर्वोच्च न्यायालयाने स्थगितीचा निर्णय दिला असला तरी, निर्दोष ठरवल्यानंतर तुरुंगातून सोडण्यात आलेल्या आरोपींना पुन्हा तुरुंगात टाकण्याची गरज नाही, असं स्पष्ट आदेशात नमूद केलं. यामुळे सध्या मुक्त झालेले ११ आरोपी तुरुंगाबाहेरच राहणार आहेत.

**तुषार मेहतांचा युक्तिवाद -**

या प्रकरणात सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी महाराष्ट्र सरकारची बाजू मांडली. त्यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना स्पष्ट केलं की, "आमची मागणी आरोपींना पुन्हा तुरुंगात टाकण्याची नाही. मात्र, उच्च न्यायालयाने निकालात जे काही निरीक्षण केले आहे, त्याचा मकोका (MCOCA) अंतर्गत चालू असलेल्या इतर प्रकरणांवर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच या निकालाला स्थगिती देणं आवश्यक आहे."

**खंडपीठाची सुनावणी**

ही सुनावणी न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एन. के. सिंह यांच्या खंडपीठासमोर झाली. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारच्या बाजूने निर्णय देताना उच्च न्यायालयाच्या निकालाला स्थगिती दिली आहे, मात्र ही तात्पुरती कारवाई असून अंतिम निर्णय नंतरच्या सुनावणीत होईल.

**निर्दोष मुक्तता -**

मुंबईतील लोकल ट्रेनमध्ये १९ वर्षांपूर्वी ११ जुलै २००६ मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी दोषी ठरवण्यात आलेल्या सर्व १२ आरोपींची मुंबई उच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. आरोपींना अमरावती, नागपूर, नाशिक आणि पुण्यातील येरवडा मध्यवर्ती कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते.

२०१५ मध्ये विशेष मकोका न्यायालयाने या १२ आरोपींना दोषी ठरवत पाच जणांना फाशीची शिक्षा सुनावली होती, तर उर्वरित आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली होती. निर्दोष ठरवलेल्या १२ पैकी एका आरोपीचा याआधीच मृत्यू झाला असल्याने आता ११ जणांची सुटका होण्याचा मार्ग मोकळा झाला. या बॉम्बस्फोटांमध्ये १८९ जण मृत्युमुखी पडले होते, तर ७०० हून अधिक जण जखमी झाले होते.

---

## भिवंडी महापालिकेच्या २७ अग्निशमन वाहनांची पावसात वाताहत ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( शरद भसाळे )**

भिवंडी शहर महानगरपालिका प्रशासनाकडून पालिकेत काम करणाऱ्या कर्मचारी व अधिकारी यांच्या कामकाजा संदर्भात योग्य कायदेशीर पध्दतीने काम होत नसल्याने सर्व कारभार प्रभारी सुरू आहे. त्यामुळे सर्व सामान्य नागरिकांसह महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना सुध्दा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचा खळबळजनक प्रकार अग्निशामक दल विभागात सुरू आहे. तसेच महापालिका प्रशासनाला केंद्र व राज्य शासना निधीतून कोट्यवधी रुपये खर्च करून लोकांच्या



सुविधेसाठी 27 " अग्निशामक वाहन " देण्यात आली आहेत. मात्र या गाडया उभ्या करण्यासाठी पालिकेच्या अग्निशामक दल विभागाकडे जागा उपलब्ध नसल्याने त्या गेल्या काही महिन्यापासून रस्त्यावर पावसाच्या पाण्यात भिजत उभ्या असल्याने त्याला गंज पकडून खराब होण्याची भीती पालिकेच्या कर्मचाऱ्यांकडूनच व्यक्त केली जात आहे.सध्या भिवंडीत फक्त 3 अग्निशामक केंद्र आहेत. लोकसंख्या पाहता त्याची संख्या वाढवून किमान 10 असणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगरविकास विभाग प्रधानसचिव यांनी या प्रकरणी सखोल चौकशी करावी अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टी चे प्रमुख सिध्दीक फक्की यांनी केली आहे.

भिवंडी शहर व ग्रामीण भागात असलेल्या रासायनिक व ज्वलनशील पदार्थांची साठवणूक केलेल्या गोदामांना अनेक वेळा भीषण आगी लागण्याचे प्रकार होत आहेत. त्यावेळी होणारी वित्त व जीवित हानी वाचवण्या साठी भिवंडी महापालिकेच्या अग्निशामक दलाचे जवान सर्व प्रथम आपले वाहन व यंत्र साधन सामुग्री घेऊन घटनास्थळी धाव घेत आहेत. अनेक वेळा अग्निशामक दलाच्या गाडया नादुरुस्त होत पान 3 वर ▶▶▶

## बंडखोरांचा बंदोबस्त करण्यासाठी माझा चष्मा नक्कीच खाली जाईल - आमदार किसन कथोरे

### भाजपा महायुतीचा माळशेज घाटात स्नेहमेळावा संपन्न !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :: दिलीप पवार**

पक्षाशी गद्दारी करून ज्यांनी त्रास देण्याचे काम केले आहे त्यांचा बंदोबस्त करण्यास आमदार किसन कथोरे समर्थ आहे त्यांच्या साठी माझा चष्मा नक्की खाली जाईल असा सुचक इशारा आमदार कथोरे यांनी पक्षांतर्गत व इतर विरोधकांना माळशेज येथे झालेल्या स्नेहभोजन मेळाव्यात दिला आहे. भाजपा महायुतीचा स्नेहभोजन व कार्यकर्ता मेळावा दरवर्षी प्रमाणे माळशेज घाट येथे 23 जुलै रोजी एम.टी.डी.सभागृहात पार पडला.या मेळाव्याला महायुतीचे चार ते पाच हजार कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार कथोरे यांनी विरोधकांचा खरपुस समाचार घेतला.माझ्या मतदार संघात बाहेरच्यांनी लुडबुड करू नये असा सज्जड इशारा त्यांनी दिला असून आमच्यात तेल ओतण्याचा प्रयत्न करू नका मग मी माचिस घेऊन आग लावण्यास तयार आहे.काहींना प्रकल्पासाठी कोणत्या मंजुर्या लागतात तेच कळत नाही आणी विकासाच्या नावाने





बोंबा मारत सुटतात.मुरबाडचा इतिहास जगाच्या नकाशावर पोहचणार आहे. संगम तिर्थक्षेत्राच्या बाबतीत कुणीही राजकारण करू नये 18 कोटीचे टेंडर निघाले असून ज्यांना शंका असेल त्यांनी मला येऊन भेटा असे आवाहन त्यांनी खोट्या वावड्या उठवणार्यांना दिला आहे.

खरेदी विक्री संघा बाबत बोलताना म्हणाले की आताचे संचालक मंडळ हे मागच्या दाराने आले नसून मंत्रालयातून निवड झाली आहे.भ्रष्टाचार बाहेर येईल या भितीने सध्या काही लोक टिका करत आहेत असा टोमणा मा.आमदार गोटिराम पवारांचे नाव न घेता लगावला.

आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती, नगरपरिषद निवडणूका महायुतीतुन लढणार आहोत.सर्वांना न्याय मिळेल आमची युती खानदानी बरोबर असून विरोधकांचा सुपडा साफ होणार असल्याचे भाष्य आमदार कथोरे यांनी केले. यामेळाव्याला भाजपा जिल्हा अध्यक्ष जितेंद्र डाकी , राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव, शिवसेना शिंदे गटाचे कांतिलाल कंटे, रिपाईचे दिनेश उघडे उपस्थित राहून मार्गदर्शन केले. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल घरत यांनी करताना आमदार कथोरेंना या ही वेळेला मंत्रीपद न दिल्याने तळागाळातील कार्यकर्त्यांच्या मनात सळ राहीली असून महायुतीला निष्ठावंत कार्यकर्त्याची गरज आहे. शेतकऱ्यांना कधीही न्याय मिळाला नव्हता तो आमदार कथोरे यांनी दिला असल्याचे प्रास्ताविकात अनिल घरत यांनी मांडले.

या मेळाव्याला कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रविंद्र घोडविंदे, टिडीसी बँकेचे संचालक राजेश पाटील, उल्हास बांगर, भरत पाटील, मुरबाड तालुका भाजपाचे अध्यक्ष दिपक पवार, जितेंद्र भावार्थे, नितीन मोहपे, सुहास मोरे,खरेदी विक्री संघाचे चेअरमन संतोष पवार, सुरेश बांगर, चंद्रकांत बोस्टे, दिपक कथोरे, विलासकाका देशमुख,मा.नगराध्यक्ष मोहन सासे, किसन कथोरे, मुकेश विशे,आण्णा साळवे,जयवंत कराळे,संतोष घुडे यांच्यासह बदलापूर, कल्याण, मुरबाड महायुतीचे, पदाधिकारी, नगरसेवक, महिला कार्यकर्ते मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.





---

## दोन महिन्यात कचऱ्यावर फुलवली हिरवळ

### ठाणे मनपाच्या अभिनव प्रकल्पाचे कौतुक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बातमीदार**

राज्य सरकारने ठाणे महापालिकेला भिवंडीतील आतकोली येथे शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी ३४ हेक्टर क्षेत्र प्रदान केले आहे. या जागेवर ठाणे महापालिकेतर्फे घनकचऱ्याचे व्यवस्थापन केले जात आहे. या जागेवर गौण खनिजाचे उत्खनन झालेले असून आता या जागेचा विकास पालिकेमार्फत होत आहे. तसेच या क्षेपणभूमीचा आणि परिसराचा पर्यावरणपूरक विकास करण्यासाठी संरक्षक भिंतीलगत बांबूचे बन आणि मध्यभागी विविध ठिकाणी हरित बेट तयार करण्याचे निर्देश तीन महिन्यांपूर्वी येथील भेटीनंतर ठाणे पालिकेचे आयुक्त सौरभ राव यांनी प्रशासनाला दिले होते.

प्रकल्पाने स्थानिकांना कोणताच त्रास व भविष्यात दुर्गंधीची समस्या निर्माण होऊ नये, यासाठी दक्षता घेण्याच्या सूचना राव यांनी दिल्याने ठाणे पालिकेचे उपायुक्त (घनकचरा) मनीष जोशी व उपायुक्त (उद्यान) मधुकर बोडके यांनी येथे हिरवळ फुलण्यासाठी कृती आराखडा आखला. त्यानुसार सहायक आयुक्त (घनकचरा) सुनील मोरे व आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्या टीमने याठिकाणी कचऱ्यावर अवघ्या दोन महिन्यात हिरवळ तयार केली. कचरा टाकला की सर्वप्रथम त्यावर लाल मातीचा थर दिला जातो. त्यानंतर दुर्गंधीनाशक व जंतूनाशक रसायनाची फवारणी केली जाते. तसेच, कचरा व मातीचा विशिष्ट थर तयार झाल्यावर तेथे हिरवळ तयार करण्यात आली. त्यामुळे परिसराचे रूपडेच पालटले आहे.

**दुर्गंधीची समस्या मार्गी लागणार**

डम्पिंग ग्राऊंडच्या चहुबाजूने तीन प्रकारच्या बांबूच्या रोपांची लागवड करण्यात आली आहे. उंच, मध्यम व लहान आकाराच्या बांबूच्या तब्बल ३०० रोपांची येथे लागवड करण्यात आली आहे. हा आकडा भविष्यात तीन हजारापर्यंत वाढणार आहे. या भागात पूर्वीपासून अस्तित्वात असणाऱ्या जुन्या वृक्षांना नवसंजीवनी देण्यात आली असून तब्बल ११० कुडुनिंबाची रोपे येथे लावण्यात आली आहे. या झाडांमधून मोठ्या प्रमाणात होणारे ऑक्सिजनचे उत्सर्जन लक्षात घेता या भागातील दुर्गंधीची समस्या मार्गी लागणार असल्याचे उपायुक्त (उद्यान) मधुकर बोडके यांनी सांगितले.

## बदलापूरमध्ये संसर्गजन्य तापाची साथ

### आरोग्य व्यवस्थेवरील ताण वाढला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता


**बदलापूर, ता. २४ (बातमीदार):** बदलत्या हवामानाचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. बदलापुरात संसर्गजन्य तापाचे रुग्ण वाढल्याचे चित्र समोर येत आहे. त्यात स्थानक परिसरात पालिकेचे दुबे रुग्णालय आहे; मात्र या ठिकाणी रुग्णांना उपचारासाठी दाखल करण्याची तसेच इतर सुविधांअभावी डेंगी, मलेरिया किंवा इतर पावसाळी आजार असल्यास बदलापूर पूर्वेकडील उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेण्यासाठी रुग्णांना जावे लागते. त्यामुळे उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची संख्या वाढली आहे.

पावसाळा सुरू झाला की दिवसाला हजारपेक्षा अधिक रुग्ण येतात, त्यात निदान तीनशे ते चारशे रुग्ण हे ताप, सर्दी, खोकल्याचे असतात. त्यातून जास्त गंभीर परिस्थिती असण्याची लक्षणे निदान ३० ते ४० रुग्णांना तरी जाणवत असतात. तसेच ग्रामीण भागात राहणारे नागरिक रुग्णालय लांब असल्याने बरेचदा त्रास अंगावर काढतात. त्यामुळे हा त्रास बळावतो आणि रुग्णालयात दाखल होण्याची वेळ येते. त्यामुळे निदान पालिकेच्या दुबे रुग्णालयात या सुविधा करून देण्याची मागणी नागरिककरत आहेत.

या रुग्णालयात एकच डॉक्टर असल्याने त्यात अंतररुग्ण उपचारासाठी सुविधा नाहीत. त्यामुळे गंभीर रुग्णांना पुढील उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठवले जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ताण पडतो. रुग्णांना आपल्या तपासणीची वेळ येईपर्यंत एका रुग्णाला दीड ते दोन तास थांबावे लागत आहे. तसेच गर्भवती महिला नियमित तपासणीसाठी येत असतात, श्वानदंश, सर्प किंवा विंचू दशांचे रुग्ण, टीबी रुग्ण या ठिकाणी उपचार आणि औषधे घेण्यासाठी येत असतात. त्यामुळे पालिकेच्या दुबे रुग्णालयात डॉक्टरांची व इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या वाढवावी, तसेच अंतर रुग्ण दाखल करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी नागरिक करत आहेत.

# कणेकरांच्या निधनानंतर खुमासदार लेखणी थंडावली

महाराष्ट्रातील प्रसिद्ध पत्रकार, लेखक, स्तंभ लेखक शिरीष कणेकर यांचा आज स्मृतिदिन. २५ जुलै २०२३ रोजी वयाच्या ८० व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने सर्वांना धक्का बसला होता कारण ते असे अचानक निघून जातील असे कोणालाही वाटले नव्हते कारण त्यांच्या मृत्यूच्या आदल्या दिवशी त्यांनी लिहिलेले लेख वर्तमानपत्रात छापून आले होते. माझ्यासाठी तर तो खूप मोठा धक्का होता कारण ते माझे सर्वात आवडते लेखक होते. त्यांची जवळपास सर्वच पुस्तके मी वाचून काढली आहेत. वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचूनच मी स्तंभलेखनाकडे वळलो. त्यांच्या लेखाचा विषय माझा सर्वात आवडीचा विषय. माझ्याच कशाला आज जे चाळीशी - पन्नाशीत आहे त्या सर्वांचा आवडीचा विषय ते आपल्या लेखणीतून खुमासदारपणे हाताळत आणि तो विषय म्हणजे चित्रपट आणि क्रिकेट. वर्तमान पत्रात त्यांचे चित्रपट आणि क्रिकेटवर लेख छापून आले की ते झटक्यात वाचून संपवणे आणि त्यावर तासनतास चर्चा करणे हा आमच्या मित्र मंडळींचा आवडता छंद. त्यांच्यामुळेच आम्हाला जुन्या काळातील कुंदनलाल सैगल, दिलीप कुमार, राज कुमार, अशोक कुमार, राज कपूर, शम्मी कपूर, देवानंद या अभिनेत्यांची ओळख झाली. तसेच पन्नास ते ऐंशी च्या दशकातील क्रिकेटपटूंची ओळख झाली. केवळ अभिनेते, अभिनेत्री आणि क्रिकेटरच नव्हे तर हिंदी सिनेसंगीत हा देखील त्यांच्या लेखनाचा आवडीचा विषय होता. अतिशय अभ्यासपूर्ण, खुसखुशीत आणि विनोदीशैली हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्य. अतिशय खुसखुशीत विनोदी शैलीत ते लिहित असल्याने तरुण वर्ग त्यांचा मोठा वाचक बनला. तरुण मुलांचे ते आवडते लेखक होते. तरुण मुले कट्ट्यावर बसून ज्या प्रमाणे गप्पा मारत अगदी तसेच त्यांचे लेखन होते त्यामुळेच त्यांचा सर्वाधिक वाचकवर्ग हा तरुण होता. वर्तमानपत्रात लेख लिहून स्तंभलेखक म्हणून नावारूपास



आलेल्या शिरीष कणेकर यांनी पुढे अनेक पुस्तके लिहिली. यादो की बारात, शिरीषासन, सिनेमाबाजी, मुद्दे आणि गुद्दे, चहाटळकी, सुरपारंब्या, सिनेमगिरी, लागाव बत्ती, कणेकरी, चिमटे आणि गालगुच्चे, आसपास, मेतकूट, चित्ररूप, कल्चर - वल्हचर असे त्यांचे विविध वर्तमानपत्रातील स्तंभ लेखन गाजले. गाये चला जा, यादो की बारात, एक्केचाळीस, गोळी मार भेजे में, गोतावळा, कुरापत, मखलाशी, फटकेबाजी, पुन्हा यादों की बारात, टिवल्या - बावल्या, चंची, चापट पोळी, डॉलरच्या देशा, एकला, रहस्यवल्ली, सुरपारंब्या, क्रिकेटवेध, नट - बोलट, बोलपट, सिनेमा डॉट कॉम ही त्यांची पुस्तके खूप लोकप्रिय झाली. शिरीष कणेकर यांनी लेखनासोबत क्रिकेट व चित्रपटावर स्टॅण्ड अप शो देखील केले. माझी फिल्लमबाजी, फटकेबाजी, आणि पुन्हा कणेकर हे त्यांचे स्टँड अप शो खूप लोकप्रिय झाले. त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले पण वाचकांच्या मनात त्यांचे जे स्थान होते ते कोणत्याही पुरस्कारापेक्षा श्रेष्ठ होते. कणेकर गेले आणि खुमासदार लेखणी थंडावली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. आपल्या खुमासदार लेखनाने तरुण वाचकांच्या मनात आगळे स्थान निर्माण करणारा हा अवलिया लेखक आज आपल्यात नाही हे मन मानायला तयार नाही. शिरीष कणेकरांची फिल्लमबाजी, फटकेबाजी पुन्हा अनुभवता येणार नाही याची खंत वाटते. असो नियतीने जे मांडून ठेवले आहे ते स्वीकारावेच लागेल. शिरीष कणेकर यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

## गीतासार



### अध्याय १७
### श्रद्धात्रयविभागयोगः

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः । दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥ १७-२१ ॥

परंतु जे दान क्लेशपूर्वक, प्रत्युपकाराच्या हेतूने अथवा फळ नजरेसमोर ठेवून दिले जाते, ते दान राजस म्हटले आहे. ॥ १७-२१ ॥

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ १७-२२ ॥

जे दान सत्काराशिवाय किंवा तिरस्कारपूर्वक अयोग्य ठिकाणी, अयोग्य काळी आणि कुपात्री दिले जाते, ते दान तामस म्हटले गेले आहे. ॥ १७-२२ ॥


ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः । ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ १७-२३ ॥

ॐ तत् सत् अशी तीन प्रकारची सच्चिदानंदघन ब्रह्माची नावे सांगितली आहेत. त्यांपासून सृष्टीच्या आरंभी ब्राह्मण, वेद आणि यज्ञादी रचले गेले आहेत. ॥ १७-२३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः । प्रवर्तन्ते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥ १७-२४ ॥

म्हणून वेदमंत्रांचा उच्चार करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषांच्या शास्त्राने सांगितलेल्या यज्ञ, दान व तप रूप क्रियांचा नेहमी ॐ या परमात्म्याच्या नावाचा उच्चार करूनच आरंभ होत असतो. ॥ १७-२४ ॥

## कोपरखैरणे मध्ये पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा



**या रोजगार मेळाव्यामध्ये एकूण २१ उद्योजकांनी सहभाग घेतला असून एकुण ५१० उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण १३९ उमेदवारांची प्राथमिक व १४ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली.**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व उत्कर्ष ग्रामस्थ मंडळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि.22 जुलै 2025 रोजी सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात, याकरिता शेतकरी समाज हॉल, सेक्टर 4-अ, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या रोजगार मेळाव्यामध्ये एकूण 21 उद्योजकांनी सहभाग घेतला असून एकुण 510 उमेदवारांनी मुलाखती दिल्या व त्यामध्ये एकूण 139 उमेदवारांची प्राथमिक व 14 उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी लोकसभा सदस्य संजय नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक अभिषेक पवार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई विभागाचे उपायुक्त सचिन जाधव, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहायक आयुक्त संध्या साळुंखे, राजेश पाटील, जिल्हा समन्वयक शुभम शिंदे, माजी सभागृह नेते रवींद्र इथापे, मुख्याध्यापिका श्रीमती भाग्यश्री चौधरी, समाजसेवक कृष्णा पाटील, सामाजिक कार्यकर्ते अमित ढोमसे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ताजी घंगाळे यांनी केले.

## म्युनसिपल कर्मचारी कामगार सेनेने मानले केडीएमसी आयुक्तांचे आभार

### वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आल्याने मानले आभार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील वर्ग-३ व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आल्याने म्युनसिपल कर्मचारी कामगार सेनेने केडीएमसी आयुक्तांचे आभार मानले आहेत.

कल्याण डोंबिवली महानगरपालिका कामगारांच्या वारसांना "वारसहक्काने " व "अनुकंपातत्वाने नोकरी देण्याबाबत व कार्यरत अधिकारी कर्मचारी तसंच सेवानिवृत्त कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार आश्वासित प्रगती योजना (१०-२०-३०) लाभ मिळण्याबाबत म्युनसिपल कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष बाळ हरदास यांच्या मार्गदर्शनाखाली युनियनेचे सरचिटणीस सचिन वासरे, कार्याध्यक्ष अजय पवार, उपाध्यक्ष सुरेश तेलवणे, सुनिल पवार, सल्लागार घ.क.व्य नरेंद्र धोत्रे व इतर पदाधिकारी हे या विषयावर चर्चा करित होते. तसा पत्रव्यवहार सुरु ठेवला होता.



युनियनच्या अथक प्रयत्नामुळे वर्ग-३ व वर्ग-४ ८८८ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागु करण्यात आली. यापूर्वी वर्ग ४ च्या १९३४ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आली. तसेच आतापर्यंत २५२ कर्मचाऱ्यांना वारसांना वारसहक्काने व अनुकंपतत्वाने कायमस्वरुपी सेवेत सामावुन घेतल आहे.

याबाबत म्युनसिपल कर्मचारी कामगार सेनेकडून केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, उपायुक्त वंदना गुळवे, सहा. आयुक्त सुषमा मांडगे तसेच समान्य प्रशासन विभागा मधील कर्मचारी सुनिल बागुल, श्रृती कानिटकर, संजय गोरुले, अनंत कोटरा, शशी महाले, संजय काळे, धनंजय भंडारकवठेकर, रमेश सुपे, मधुकर भोये, संसारे या सर्वांना शाल, पुष्पगुच्छ देऊन आभार मानले असल्याची माहिती सचिन बासरे यांनी दिली.

## श्रमजीवी संघटना भिवंडी तालुका सचिव पदी विश्वनाथ पासारी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



झिडके-अंबाडी : श्रमजीवी संघटना महाराष्ट्र राज्य. संघटनेच्या भिवंडी तालुका ग्रामीण सचिव पदी विश्वनाथ पासारी यांची श्रमजीवी संघटनेचे संस्थापक-अध्यक्ष विवेकभाऊ पंडीत यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली. यावेळेस संघटनेचे विद्यमान अध्यक्ष रामभाऊ वारणा हेही उपस्थित होते.

विश्वनाथ पासारी हे संघटनेचे माजी अध्यक्ष दिवंगत- लहू पासारी यांचे सुपुत्र आहेत.वडीलांचा संघटनेच्या कार्याचा वारसा लाभलेले विश्वनाथ पासारी हे लहानपणापासूनच संघटनेच्या कार्याकडे वळलेले असल्यामुळेच त्यांनी किमान वेतन आंदोलन,वसई-विरार दहशत विरोधी आंदोलन,आदिवासी समाजातील मालकी हक्काच्या शेतजमिनी धनदांडग्यांनी हडप केलेल्या मंत्रालय आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्यामुळे पोलीसांचा लाठीहल्ला सुद्धा सहन केलेला आहे,तसेच श्रमजीवी संघटनेत बालसंघटन भिवंडी तालुका प्रमुख म्हणून कार्य केले आहे. साक्षरता मोहीमेत विशेष योगदान असल्यामुळेच त्यांचा मुंबई आकाशवाणीने आयोजित केलेल्या "लोकजागर " कार्यक्रमात बोलावून विशेष कार्य म्हणून मुलाखतही घेण्यात आली आहे. त्याचबरोबर संघटनेच्या उसगाव-डोंगरी या केंद्रीय कार्यालयात कार्यालय प्रमुख म्हणूनही जबाबदारी सांभाळलेली आहे.

एकंदरीत विश्वनाथ पासारी यांच्या एकूण कामगिरीची विशेष दखल घेऊन एक तडफदार,अभ्यासू आणि सामाजिक कार्याबद्दल तळमळ असणारा होतकरू तरुण कार्यकर्ता म्हणून भिवंडी तालुक्यासारख्या एका मोठ्या तालुक्यात तालुका सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहेत.

नियमित वाचा
दैं. ठाणे
जीवनदीप वार्ता

## मा. नगरसेवक निलेश शिंदे यांचा वाढदिवस संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक, कल्याण पूर्व शिवसेना शहरप्रमुख, निलेश शिवाजी शिंदे यांचा वाढदिवस 22 जुलै 2025 रोजी जल्लोषात संपन्न झाला.

निलेश शिंदे हे लोकप्रिय आणि कर्तव्यदक्ष असल्यामुळे यांचा जनसंपर्क मोठा आहे. त्यांचे अनेक मित्रमंडळी नातेवाईक , हितचिंतक आणि सामाजिक शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी




निलेश शिंदे यांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा दिल्या. निलेश शिंदे यांनी येणाऱ्या सर्व पाहुण्यांकरिता स्नेहभोजनाचे आयोजन केले होते.

## वाहुली येथे भाजपाच्या वतीने रक्तदान शिबीर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील मुबई नाशीक महामार्गावरील वाहुली येथे भाजपाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीर उत्साहात संपन्न झाले यावेळी शिबीराला नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्त मंगळवारी सगळीकडे महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.त्याचाच भाग म्हणून बुधवारी भाजपा भिवंडी तालुका ग्रामीण अध्यक्ष पुर्व मंडळ श्रीकांत गायकर व संकल्प ब्लड सेंटर कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई नाशीक महामार्गावरील हॉटेल शिवसागरच्या बाजुला असलेल्या भाजपा कार्यालयाच्या प्रांगणात हे रक्तदान शिबिर घेण्यात आले.शिबीरास नागरीकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.यावेळी परिसरातील एकुण ४० नागरीकांनी रक्तदान केले. यावेळी रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.जमा झालेल्या रक्ताच्या पिशव्या संकल्प ब्लड सेंटरमध्ये जमा करण्यात आल्या यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सचीन पाटील माजी सभापती दत्तात्रेय पाटोळे,गुरूनाथ जाधव,भाजपा जिल्हा कार्याध्यक्ष जगन पाटील सरपंच गोरखनाथ सुतार कुकसे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच भरत पाटील,माजी उपसरपंच निळकंठ विशे, भगवान सांबरे, काशीनाथ शेलार,अजय पाटील, विष्णु पाटील, किरण वारघडे, सुरज ठाणगे, रूपेश मोगरे, रवी पाटील, राम फर्डे, उपस्थीत होते.

## रामदास गावंड सामाजिक संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रामदास गवत्या गावंड कला, क्रीडा, शैक्षणिक व सामाजिक संस्था आवरे, व ए. एस सी कॉलेज बी एस सी बॅच 1992 च्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आवरे, गोवठणे, पाले, पाणदिवे, सारडे वशेणी, पुनाडे, पुनाडे वाडी, कडापे या दहा गाव परिसरातल्या शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व वह्या वाटप करण्यात आले.




विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण व्हावी व शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी ए. एस. सी कॉलेज बी. एस. सी बॅच 1992 व श्री रामदास गवत्या गावंड सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नितीन रामदास गावंड( आई फार्मा व आई मेडिकल मालक, पनवेल तालुका केमिस्ट अँड डिस्ट्रिब्युटर्स असोसिएशन अध्यक्ष ) ऍड. राजेश ठाकूर, नेरे (थेरा रिसॉर्ट चे मालक ) रामलाल ठाकूर, पुनाडे (दिपक फर्टीलीझर्स ), संजय म्हात्रे, बामण डोंगरी (बी पी सी एल, मुंबई )सदाशिव पाटील, पुनाडे (सलोनी ऑरगॅनिक केमिकॅल्स) हसुराम म्हात्रे, वशेणी (डी ए व्ही चे सिनियर अकाउंटंट ) या सर्व सहकाऱ्यांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापकांनी व शिक्षक वर्गांनी चांगलं मोलाचं सहकार्य केलं. तसेच प्रत्यक्ष कार्यक्रम पार पाडण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष संदीप रामदास गावंड, साईनाथ रामदास गावंड, सदाशिव पाटील, राजेश कोंडिलकर, गणेश गावंड, अनिल गावंड शाळेतील विद्यार्थी मुख्याध्यापक,शिक्षक,सर्व उपस्थित होते.

## रेसिपी
### बीटरुट पराठा



साहित्य
उकडलेले बीट- 2
उकडलेले बटाटे- 2
तांदळाचे पीठ- 1 चमचा
हिरवी मिरची, आले लसूण पेस्ट- 2 चमचे
जिरे पावडर- अर्धा चमचा
लाल तिखट- पाव चमचा
बारीक चिरलेली कोथिंबीर
मीठ - चवीनुसार
चाट मसाला
रवा
तेल

कृती
एका भांड्यात उकडलेले बीट आणि बटाटे मॅश करून घ्या.
यानंतर त्यात हिरवी मिरची, आले लसूण पेस्ट, जिरे पावडर, लाल तिखट, मीठ आणि बारीक चिरलेली कोथिंबीर घाला.
यानंतर यात तांदळाचे पीठ घालून मिश्रण मळून घ्या.
हाताला थोडे तेल लावून मिश्रणाचे कटलेट तयार करा.
तयार कटलेट रव्यामध्ये घोळवून घ्या.
तव्यावर कटलेट दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत शॅलो फ्राय करा.
कटलेट वरून चाट मसाला घालून हिरव्या चटणी किंवा टोमॅटो सॉससह गरम सर्व्ह करा.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
मित्रांसोबत रेस्टॉरंटमध्ये जाल, तिथे आनंदाचे वातावरण असेल. ऑफिसमध्ये काही समस्यांमुळे मूड खराब होऊ शकतो, शक्य तितके सामान्य रहा.

**वृषभ**
प्राध्यापकांसाठी दिवस लाभदायक राहील. पुढे जाण्याची संधी मिळेल. पालक मुलांच्या उज्वल भविष्याचा विचार करू शकतात. वैवाहिक जीवन उत्तम राहील.

**मिथुन**
ठरवलेल्या कामात तुम्हाला नक्कीच यश मिळेल. या राशीच्या लोकांनी गरजेपेक्षा जास्त कोणावरही विश्वास ठेवू नये. आज तुमचे आरोग्य चांगले राहील.

**कर्क**
स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. तुम्ही सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहात, सन्मान होईल.

**सिंह**
कायदा करणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन विषयात खूप रस मिळेल.वैवाहिक नात्यात सुरू असलेल्या कलहातून तुम्हाला आराम मिळेल. नात्यात गोडवा येईल.

**कन्या**
स्पर्धेच्या तयारीत यश मिळेल. तुमचा सराव सुरू ठेवा. या राशीच्या महिलांसाठी आज चांगल्या संधी निर्माण होत आहेत ज्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करायचा आहे.

**तूळ**
तुम्ही दिवसभर उत्साही राहाल हार्डवेअर व्यावसायिकांसाठी दिवस लाभदायक ठरेल. तुम्हाला तुमच्या प्रियकराकडून सरप्राईज मिळेल.

**वृश्चिक**
डोळ्यांच्या समस्यांनी त्रस्त असलेल्यांनी चांगल्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. वैवाहिक जीवन आनंदाने भरलेले असेल.

**धनु**
बांधकाम व्यावसायिकांची सुरू असलेली कामे पूर्ण होतील. मुलाकडून तुम्हाला आनंद मिळेल. आरोग्य चांगले राहील.आजूबाजूच्या लोकांशी सौहार्द ठेवा.

**मकर**
मसालेयुक्त पदार्थ टाळल्यास आरोग्य चांगले राहील. जोडीदारासोबतचे गैरसमज दूर होतील.आर्थिक स्थिती मजबूत होईल.व्यवसायात पुढे जाणे योग्य राहील.

**कुंभ**
तुमच्या नात्यात गोडवा वाढेल. विद्यार्थी वर्गमित्रांच्या मदतीने आपली पूर्वीची प्रलंबित कामे पूर्ण करतील, नोकरीच्या ठिकाणी पुढे जाल.

**मीन**
धार्मिक कार्याकडे तुमचा कल राहील. इतरांना मदत करण्यात रस वाढेल. जर तुम्ही कोणाकडून पैसे घेतले असतील तर तुम्ही ते लवकरच परत कराल.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५-२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in

जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!
7775851123, 8108559566
9619188558

# विरार-भिवंडी-अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पातील शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य मोबदला द्या - आमदार महेश चौगुले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी )**

विरार- भिवंडी - अलिबाग कॉरिडॉर प्रकल्पामुळे भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या बाधित जमिनीचा तुटपुंजा मोबदला मिळत असल्याने त्यांना इतर प्रकल्पांप्रमाणे योग्य मोबदला देण्यात यावा अशी मागणी लेखी पत्राद्वारे भिवंडी पश्चिमचे आमदार महेश चौगुले यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.




महाराष्ट्र राज्य सरकारचा विरार-भिवंडी अलिबाग बहुउद्देशीय महामार्ग हा एक महत्त्वाकांक्षी व महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. तसेच राज्याच्या दळणवळणाच्या दृष्टीने तो अत्यंत आवश्यक प्रकल्प आहे. या प्रकल्पामुळे मुंबई महानगर प्रदेशातील (MMR) वाहतूक कोंडी कमी होणार असून, विरार, भिवंडी, कळंबोली व पेण हे भाग जेएनपीटी बंदर व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी थेट जोडले जाणार आहेत.त्यामुळे या संपूर्ण परिसराचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने घडणार आहे. या प्रकल्पाअंतर्गत भिवंडी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात जमिनी बाधित होत असून, सध्या या प्रकल्पासाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरू आहे आणि शेतकऱ्यांना भूसंपादना संदर्भातील नोटीसा प्राप्त झाल्या आहेत त्यामुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे.

भिवंडी तालुका हा औद्योगिक दृष्ट्या विकसित तालुका असून या ठिकाणी मोठे मोठे उद्योगधंदे उभारले आहेत. त्यामधून मोठ्या प्रमाणात रोजगार आणि आर्थिक चलन येथील शेतकऱ्यांना मिळत आहे, भिवंडी तालुक्यातून रस्ते व रेल्वेचे अनेक प्रकल्प जात असून भिवंडी तालुक्यातील शेतकरी व स्थानिक नागरिक यांच्याकडून असे वारंवार निदर्शनास येत आहे की, इतर मोठ्या प्रकल्पांप्रमाणे (उदा. समृद्धी महामार्ग, बुलेट ट्रेन, मुंबई-वडोदरा महामार्ग) दिल्या गेलेल्या मोबदल्याच्या तुलनेत या प्रकल्पात देण्यात येणारा मोबदला तुटपुंजा व अन्यायकारक आहे.तसेच

रायगड व ठाणे जिल्ह्यांतील भूसंपादन दरांमध्ये मोठा फरक असल्यामुळे ठाणे जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. त्यामुळे विरार-अलिबाग महामार्ग प्रकल्पासाठी नव्याने दर निश्चिती करण्यासाठी स्वतंत्र दर निश्चिती समितीची तातडीने स्थापना करण्यात यावी.भिवंडी तालुक्यातील सर्व प्रकल्प बाधित जमिनींना सरसकट "गुणांक 2" लागू करण्यात यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळू शकेल.सध्या देण्यात आलेली २१ दिवसांची भूसंपादन संमतीची मुदत वाढवून किमान ६० दिवसांची मुदत देण्यात यावी, जेणेकरून शेतकऱ्यांना आपली बाजू समजावून सांगण्यास आणि कायदेशीर सल्ला घेण्यास पुरेसा वेळ मिळेल असे मत आमदार महेश चौघुले यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे व्यक्त केले आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**महिला व बालकल्याण विभाग**

**● जाहीर सूचना - मुदतवाढ ●**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील महिला व बालकल्याण विभागामार्फत खालील तक्त्यात नमूद योजना लागू करण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | तपशिल | अनुदान रक्कम |
|---|---|---|
| १ | कन्यादान योजना:- निराधार / विधवा / परित्यक्त्या/घटस्फोटीत महिलांच्या मुलीचे विवाहाकरिता अनुदान देणे. | २०,०००/- प्रती लाभार्थी |
| २ | विधवा पत्नीस अनुदान: घरातील कर्त्या पुरुषाचे निधन झाल्यांस त्याचे विधवा पत्नीस अनुदान देणे. | १०,०००/- प्रती लाभार्थी |
| ३ | सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना व सावित्रीबाई फुले स्पर्धा परिक्षा अनुदान योजना | १,००,०००/- प्रती लाभार्थी |

- सदर योजनांबाबतचे अर्ज महिला व बालकल्याण विभाग व कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अधिकृत संकेतस्थळ www.kdmc.gov.in येथे उपलब्ध आहेत.
- अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारिख २३/०८/२०२५
- अर्ज दाखल करण्याचे ठिकाण : महिला व बालकल्याण विभाग, महापालिका मुख्यालय, कल्याण डोंबिवली महानगरपालिका

* जावक क्रमांक :-
कडोंमपा/जसवि/मुका/३३०
दिनांक - २४ जुलै २०२५

सही/-
(कांचन गायकवाड)
उप आयुक्त,
महिला व बाल कल्याण विभाग
कल्याण डोंबिवली महानगरपलिका, कल्याण

# नवी मुंबईच्या पुनर्विकासाला काँग्रेसची आडकाठी?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ता. २४ (बातमीदार)**

नवी मुंबईतील धोकादायक व जुने घरगुती बांधकाम क्लस्टर पद्धतीने पुनर्विकासाच्या दिशेने पुढे जात आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पाला हिरवा कंदील दाखविला आहे. त्यामुळे आता तीन ऐवजी चार एफएसआय मिळणार असल्याने रहिवाशांना अधिक मोठ्या घरांची आशा निर्माण झाली आहे. या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले असले तरी, काँग्रेस पक्षाचे ओबीसी सेल जिल्हाध्यक्ष संतोष सुतार यांनी या पुनर्विकास प्रकल्पाला तीव्र विरोध दर्शवला आहे.

सुतार यांनी यापूर्वीच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालिका आयुक्तांना पत्र पाठवून या निर्णयाविरोधात भूमिका मांडली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, नवी मुंबईतील लोकसंख्या या पुनर्विकासामुळे झपाट्याने वाढेल. परिणामी पाणीपुरवठा, पार्किंग, आरोग्य व शिक्षण सुविधा यावर प्रचंड ताण येईल. सध्या पालिकेला प्रकल्पग्रस्तांना सुविधा पुरवताना अडचणी येत आहेत. अशा परिस्थितीत आणखी भार पेलणे अशक्य होईल. सिडकोने नवी मुंबई वसवताना आमच्या मैदानांचे भूखंड विकसकांना दिले. त्यामुळे आज नवी मुंबईतील मुलांना खेळायला मैदाने नाहीत. त्यांना पैसे मोजून टर्फवर खेळावे लागते. शाळा-महाविद्यालये भरमसाट फी घेत आहेत. याअगोदरच सुविधा अपुऱ्या असताना बिल्डरांना फायदा करून देण्यासाठी पुनर्विकासाच्या नावाखाली सामान्यांची गळचेपी केली जात आहे.

नागरिकांनी जागरूक राहावे

संतोष सुतार यांनी स्थानिक जनतेला सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. पुनर्विकासाचा हा डाव प्रकल्पग्रस्तांच्या गरजेपेक्षा बिल्डरांच्या फायद्यासाठी आखला जात आहे. सिंगापूरसारख्या शहराचे स्वप्न दाखवत नवी मुंबईची अवस्था यूपी-बिहारसारखी होण्यास वेळ लागणार नाही. स्थानिक नेत्यांनीही या प्रकारास विरोध केला पाहिजे. त्यामुळे संबंधित केंद्रीय मंत्र्यांच्या भेटीसाठी दिल्लीला आलो असल्याचे सुतार यांनी सांगितले.

# झोळीतील आरोग्य व्यवस्था!

## शहापूर तालुक्यात उपचारासाठी गर्भवती महिलेचा झोळीतून प्रवास

### महिन्याभरातील तिसरी घटना



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**आसनगाव :** डोंगरदऱ्यांमध्ये वसलेल्या शहापूर तालुक्यातील भवरपाडा येथील गर्भवती महिलेला रस्त्याअभावी झोळीतून तब्बल एक किमी प्रवास करावा लागला. शहापूर तालुक्यातील महिन्याभरातील ही तिसरी घटना आहे. त्यातच भवरपाडा व परिसरात मोबाईल नेटवर्कची समस्या असल्याने महिलेला खासगी गाडीतून शहापूर उप-जिल्हा रुग्णालय गाठावे लागले. संबंधित महिलेची प्रकृती स्थिर आहे. शहापूरचे शुक्लकाष्ठ कधी संपणार हा प्रश्न आदिवासींना पडला आहे.

तालुक्यातील नडगाव ग्रामपंचायतीमधील चाफेवाडी, फुगाळे ग्रामपंचायतीमधील वरसवाडी येथील महिलांनी या समस्येचा सामना केला आहे. भवरपाडा येथील मनीषा भवर या महिलेला मंगळवारी दुपारी पोटात कळा येऊ लागल्या. धो-धो पाऊस, नेटवर्क अभावी संपर्क नाही त्यातच मुख्य रस्त्यापर्यंत किमान एक किमीचा रस्ता या महिलेला झोळीतून चिखलवाटेने प्रवास करत पार करावा लागला.

**पारधीपाड्यापर्यंत आणून शहापूर उप-जिल्हा रुग्णालयात दाखल केले.**

दरम्यान, वांद्रे ग्रामपंचायत अंतर्गत भवरपाडा, दोडकेपाडा व आलनपाडा येथे वनजमिनीच्या अडचणीमुळे या पाड्यांवर जाण्यासाठी रस्ताच नसल्याचे तेथील सरपंच मारुती साठे यांनी सांगितले. गेल्या तीन - चार वर्षांपासून रस्त्याला अडचण ठरणाऱ्या वनजमिनीचा प्रस्ताव सादर करूनही त्याला मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे आदिवासींना कसरत करावी लागते.

# भाषा हे वादाचे नव्हे; संवादाचं माध्यम - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दिल्लीतल्या जेएनयू या ठिकाणी म्हणजेच जवाहरलाल नेहरु विद्यापीठात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज सामरिक अध्ययन केंद्र आणि कुसुमाग्रज मराठी भाषा अध्ययन केंद्र यांची कोनशिला ठेवण्यात आली. या कार्यक्रमानंतर झालेल्या भाषणात मराठी भाषेचं महत्त्व देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या खास शैलीत सांगितलं. भाषा संवादाचं माध्यम असतं वादाचं नाही हा मुद्दा त्यांनी आवर्जून आपल्या भाषणात मांडला. देवेंद्र फडणवीस काय म्हणाले? "मराठी भाषा ही आपली अभिजात भाषा आहे. या संदर्भातले पुरावे सादर झाले तेव्हा कळलं की देशातल्या प्राचीन भाषांपैकी मराठी भाषा आहे. आपल्या मराठी भाषेला पंतप्रधान मोदींनी अभिजात भाषेचा दर्जा दिला. मराठी कायमच अभिजात भाषा होती. त्यावर राजमुद्रा लागणं महत्त्वाचं असतं. ते काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं."

**भाषा हे संवादाचं माध्यम आहे वादाचं नाही-फडणवीस**

"मराठी भाषेने संपूर्ण भारताला समृद्ध केलं आहे. मराठी साहित्य उत्तम आहे, मराठी नाट्यसृष्टी ही देशातली सर्वोत्तम आहे. देशात थिएटर कुठल्या एका भाषेने टिकवलंच नाही तर समृद्ध केलं तर ती मराठी भाषा आहे. अशा या मराठी भाषेवर सगळीकडे आणि सगळ्या विद्यापीठांमध्ये संशोधन झालं पाहिजे. भाषा हे संवादाचं माध्यम आहे ते वादाचं माध्यम होऊच शकत नाही. भाषेच्या माध्यमातून ज्ञानाचा खजिना आपल्यापर्यंत पोहचतो. मातृभाषा महत्त्वाची आहेच, प्रत्येक मराठी माणसाला मराठी अभिमान, स्वाभिमान आणि आग्रह आहे तो स्वाभाविकच आहे. मातृभाषेचा अभिमान असलाच पाहिजे पण इतरही भारतीय भाषांचा अभिमान आम्ही बाळगला पाहिजे, हेदेखील अत्यंत महत्त्वाचं आहे. भारतीय भाषांचा तिरस्कार करतो आणि इंग्रजीला पायघड्या घालतो त्यावेळी कुठेतरी दुःख होतं. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**मराठी आणि हिंदी हा वादच नाही, मराठी भाषेसह इतर भारतीय भाषा आल्या पाहिजेत-फडणवीस**

**देवेंद्र फडणवीस भाषणात पुढे म्हणाले, "मला वाटतं की आपला वाद हा मराठी की हिंदी असा नाहीच. मराठी आहेच, मराठीला पर्यायच नाही. पण मराठीसोबत भारतीय भाषाही महत्त्वाच्या आहेत. मराठी आलीच पाहिजे आणि इतर भारतीय भाषा आल्या पाहिजेत. तमिळ भाषा देखील समृद्ध भाषा आहे. कुठल्याही भारतीय भाषेचा अभिमान वाटला पाहिजे. मातृभाषेचा सार्थ अभिमान असलाच पाहिजे. मी नेहमी असं म्हणतो मराठी माणूस संकुचित विचार करु शकत नाही कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला संकुचित विचार करायला शिकवलेलं नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी जे पसायदान मागितलं ते संपूर्ण विश्वाकरिता मागितलं. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

# मिरा भाईंदर शहरात जैव वैद्यकीय कचऱ्याच्या व्यस्थापनवर प्रश्नचिन्ह

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर:** - मिरा भाईंदर शहरातील अनेक खासगी रुग्णालये व दवाखाने जैव वैद्यकीय कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण करत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या कचऱ्याच्या सुरक्षित विल्हेवाटीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

मिरा भाईंदर शहरात दोन शासकीय रुग्णालय, १८ आरोग्य केंद्र, १९५ खासगी रुग्णालय आणि पाचशेहून अधिक खासगी दवाखाने आहेत. यातून दिवसाला जवळपास पाचशे ते सातशे किलोपर्यंत जैव वैद्यकीय कचरा निघतो. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी मार्गदर्शक सूचना दिली आहे. त्यानुसार महापालिकेच्या घनकचरा विभागाने शहरातील वैद्यकीय संस्थांना चार भागात अशा कचऱ्याचे वर्गीकरण करण्याचे सूचित केले आहे. यामध्ये पिवळा रंगाच्या पिशवीत शारीरिक व संक्रामक कचरा, लालपिशवीत प्लास्टिक कचरा, निळ्या पिशवीत काच व काचसदृश कचरा आणि पांढऱ्यां पिशवीत सुईसारख्या धारदार वस्तू ठेवण्याच्या सूचना देण्यात आला आहे. या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी पालघर येथे स्वतंत्र प्रकल्प उभारण्यात आला असून टच अँड गो संस्थेला हा कचरा गोळा करण्याचे काम देण्यात आले आहे. मात्र शहरात अजूनही



बहुतांश रुग्णालय कचऱ्याचे वर्गीकरण करत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात वर्गीकरण न करणाऱ्या रुग्णालयाचा कचरा न उचलण्याचा निर्णय संस्थेमार्फत घेतला जाणार आहे.

**महापालिकेकडून मात्र कारवाई चा दावा**

मिरा भाईंदर शहरातील खाजगी रुग्णालयांना जैववैद्यकीय कचऱ्याचे वर्गीकरण करण्याच्या सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. हे वर्गीकरण न करणाऱ्या वर ५ हजार ते २५ हजार रुपया पर्यंत दंडात्मक कारवाई केली जाते. आता पर्यंत पंधराहुन अधिक जणांवर ही कारवाई करण्यात आली आहे. तसेच यापुढे देखील वर्गीकरण न करणाऱ्या रुग्णालयावर कठोर पाऊल उचलणार असल्याची माहिती महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

# ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर शहरांत गटारीनिमित्त ठाणे पोलिसांची तळीरामांवर कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** श्रावण महिन्यात अनेकजण मांसाहार करत नाहीत. या महिन्यात अनेक जण उपवास करतात. यामुळे श्रावण महिना सुरू होण्याआधी येणाऱ्या आषाढ अमावस्येला अनेकजण 'गटारी' साजरी करतात. मटण, चिकन, मासे अशा मांसाहारी पदार्थांवर ताव मारण्याबरोबरच मद्याचे सेवन केले जाते. या पार्टीनंतर अनेकजण मद्याच्या नशेत वाहन चालवित असून यामुळे अपघातांचा धोका असतो. या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी केलेल्या तपासणीत १११ वाहनचालकांना गटारी पार्टी करणे महागात पडले आहे.

**ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर या शहरांमध्ये ठाणे वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी मद्यपी चालकांच्या तपासणीसाठी विशेष मोहीम राबविली. या कारवाईत एकूण १११ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.**

श्रावण महिन्यात महिनाभर मांसाहार करण्यास मिळणार नाही म्हणून अनेक जण श्रावण महिना सुरू होण्याआधी येणाऱ्या आषाढ आमवस्येला गटारी साजरी करतात. यंदा २३ जुलै रोजी आषाढ आमवस्येनिमित्ताने अनेकजणांनी गटारी साजरी केली. अनेकांनी शेतघरावर ही पार्टी साजरी केली. काहींनी घरीच पार्टी केली. मटण, चिकन, मासे अशा मांसाहारी पदार्थांवर ताव मारला जातो. यामुळे मटण, चिकन आणि मासे दरात मोठी वाढ झाली होती. दरवाढ झाली असली तरी त्याच्या खरेदीसाठी नागरिकांनी दुकानांवर गर्दी केली होती.

तसेच मांसाहारी पदार्थाबरोबरच मद्याचे सेवन केले जाते. यामुळे मद्य विक्रीच्या दुकानांबाहेरही एक दिवस आधीपासूनच गर्दी दिसून येत होती. गटारी पार्टी साजरी केल्यानंतर अनेकजण मद्याच्या नशेत वाहन चालवितात. यामुळे स्वतःचा जीव धोक्यात घालण्याबरोबरच इतरांचे जीवही धोक्यात घालतात. असे प्रकार घडू नयेत यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांकडून दरवर्षी नाक्यानाक्यांवर पोलिसांची पथके तैनात करून वाहनचालकांची मद्यपी तपासणी करण्यात येते.

ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, बदलापूर या शहरांमध्ये ठाणे वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी मद्यपी चालकांच्या तपासणीसाठी विशेष मोहीम राबविली. यासाठी या शहरातील नाक्यानाक्यांवर पथके तैनात करण्यात आली होती. ही पथके श्वास विश्लेषक यंत्राद्वारे वाहनचालकांची तपासणी करीत होती. या कारवाईत एकूण १११ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

# भिवंडी महापालिकेची २७ अग्निशमन वाहने ....

पान 1 वरुन ▶▶▶ असल्याने मालमत्तेचे मोठे नुकसान होत आहे.

कमी मनुष्य बळ व अग्निशामक गाड्या मुळे कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे याबाबत केंद्र व राज्य शासनाने गंभीर दखल घेऊन महापालिकेला कोट्यवधी रुपये निधी गाड्या खरेदी करण्यासाठी दिला त्यामुळे पालिका प्रशासनाने घाईघाईने गाड्या सहा महिन्यापूर्वी खरेदी केल्या मात्र अग्निशामक दलाच्या या गाडया उभ्या करण्यासाठी सुरक्षित जागा उपलब्ध नसल्याने शहरातील अंजुर फाटा,कोंडाजी वाडी गांधी रुग्णालय, व कोंबडपाडा अशा विविध ठिकाणी रस्त्यावर या गाड्या उभ्या आहेत,कोट्यवधी रुपये खर्च करून खरेदी केलेल्या या गाडया गेल्या काही दिवसापासून मुसळधार पावसामुळे पाण्यामध्ये भिजत आहे. महापालिका प्रशासन व अग्निशमन दलाच्या प्रमुखांना याबाबत तक्रार करून सुद्धा ते दुर्लक्ष करीत असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे प्रमुख सिद्धीक फक्की व फोरम फोर जस्टीस चे प्रमुख कैलास कर्णकार यांनी दिली.

> 10 लाखाहून अधिक लोकसंख्या असलेल्या भिवंडी भिवंडी शहर व ग्रामीण भागात हजारोच्या संख्येने गोदाम कार्यरत असुन त्यामध्ये ज्वलनशील पदार्थ, रासायनिक द्रव्य, फर्निचर, कपडा व इलेक्ट्रॉनिक सामान सारखे इतर साधन सामग्रीची साठवणूक केली जाते. या गोदामांना वारंवार भीषण आगी लागतात.त्यामुळे ही आग विजवण्यासाठी भिवंडी महापालिकेच्या अग्निशामक दलास पाचारण केले जाते मात्र मनपाकडे मनुष्यबळ व गाड्यांची संख्या कमी असल्यामुळे ठाणे व कल्याण महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांना पाचारण करावे लागते.त्यामुळे केंद्र व राज्य शासना महापालिकेस कोट्यवधी रुपयांचा निधी दिला मात्र त्यातून खरेदी केलेल्या 27 गाड्या रस्त्यावर पावसाच्या पाण्यात भिजत आहेत. भविष्यात त्या नादुरुस्त व गंज लागून खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी तक्रार पीपल्स रिपब्लिकन पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.त्यामुळे पालिकेत चाललेल्या या गलथान कारभाराची चौकशी होणे आवश्यक आहे. शासन भिवंडी विकासासाठी कोट्यवधी रुपये निधी देत आहे मात्र त्या पैशाचा विनियोग होत नसल्याने भिवंडीतील नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या बाबतीत सखोल चौकशी करावी अशी मागणी सिध्दीक फक्की,फोरम फोर जस्टीस चे प्रमुख कैलास कर्णकार यांनी केली आहे.

> भिवंडी अग्निशामक दलात पुरेशी गाडया व साधन सामुग्री आहे मात्र नोकर भरती न झाल्याने मनुष्यबळ अपुरे आहे त्यामुळे तारेवरची कसरत करीत अग्निशामक दलाचे जवानांना काम करावे लागत आहे.शासन मान्यतेनुसार पालिका सेवेत मुख्य अग्निशामक अधिकारी, उपमुख्य अग्निशामक अधिकारी ही दोन्ही पदे रिक्त असल्याने प्रभारी भार अधिकाऱ्यांवर सोपवला आहे.तर सब स्टेशन ऑफिसर या मंजूर 12 पदां पैकी भरले 1 रिक्त 11 ड्रायव्हर ऑपरेटर या मंजूर 31 पदां पैकी भरले 1 रिक्त 30 लीडिंग फायरमन या मंजूर 15 पदां पैकी भरले 1 रिक्त 14 फायरमन या मंजूर 100 पदां पैकी भरले 46 रिक्त 54 हे चित्र पाहिल्यास एकूण 160 पदां पैकी अवघी 49 पदे भरण्यात आल्याने पालिकेच्या वाहन विभागातील चालक या अग्निशामक विभागात सेवेसाठी घ्यावे लागत आहेत. सध्या अग्निशामक विभागात फायर वॉटर टॉवर १, फायर इंजिन ८, मल्टीपरपझ फायर इंजिन (फोम टेंडर) ५, वॉटर ब्राउझर ५, मिनी फायर इंजिन ७, फायर अँड रेस्क्यू व्हॅन (देवदुत व गुरखा) २, फायर जीप १,फायर बाईक ३ अशी तब्बल ३२ वाहने आहेत मात्र त्याची देखभाल व वाहन चालक नसल्याने फार मोठी दुरावस्था आहे.



# खडकपाडा पोलिसांनी केली इराणी चोराला अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : खडकपाडा पोलिसांनी इराणी चोरटा गाजी उर्फ टक्की लकीर हुसेन (१९) याला अटक केली आहे. मोबाईल स्न'चिंग आणि बाईक चोरीचे चार गुन्हे उघडकीस आले आहेत. त्याच्याकडून ३ बाईक आणि १४ महागडे मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत १२ लाख ५० हजार रुपये आहे. खडकपाडा पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरिक्षक विजय गायकवाड यांना मिळालेल्या माहितीच्या आधारे गाजीला अटक केली आहे. गाजी याच्या विरोधात खडकपाडा, भिवंडी, शीळ डायघर या तीन पोलिस ठाण्यात बाईक चोरीचे तीन गुन्हे दाखल आहेत. इराणी चोरटा गाजी हा दोन अल्पवयीन मुलांच्या साथीने चोरी करायचा. या दोन्ही अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांना बालसुधार गृहात पाठविले आहे. गाजी याने ठाणे, कल्याण, मुंबई, अंबरनाथ, उल्हासनगर या भागातून मोबाईल चोरी केले होते अशी माहिती सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांनी दिली आहे. हि कामगिरी पोलीस उप आयुक्त अतुल झेडे, सहायक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे, पोलीस निरीक्षक मारुती आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली खडकपाडा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक विजय गायकवाड व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे टीमचे अंमलदार पोहवा भोईर, बुधकर, लोखंडे, पोकॉ काळे, बगाड, शिंदे यांनी केली आहे.

# आर.के.पालवी शाळेच्या विद्यार्थ्यांची जिम्नॅस्टिक्स स्पर्धेसाठी निवड



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : भिवंडी तालुक्यातील पडघा येथील आर के.पालवी विद्यामंदिर या शाळेचा विद्यार्थ्यी चिराग केणे यांची जिम्नॅस्टिक ट्रॅम्पोलीन स्पर्धेसाठी राष्ट्रीय स्तरावर निवड करण्यात आल्याने सर्वत्र त्याचे अभिनंदन होत आहे.

इंग्रजी माध्यमातील इयत्ता सातवीत शिकणारा विद्यार्थी चिराग मनोहर केणे यांनी इरा ग्लोबल स्कूल डोंबिवली येथे झालेल्या जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन स्पर्धेमध्ये राज्यस्तरावर उत्कृष्ठ कामगिरी करत महाराष्ट्र राज्य संघात स्थान मिळवले.आता हा खेळाडू देहरादून येथे होणाऱ्या राष्ट्रीय जिम्नॅस्टिक्स ट्रॅम्पोलिन चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये आपले कौशल्य दाखवणार आहे.त्याने मिळवलेल्या यशामागे आर.के. पालवी विद्यामंदिर, पडघा शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पालवी सर यांचं मोठे योगदान आहे.गेली पाच वर्ष सतत नित्य नियमाने जिम्नॅस्टिक्सचा सराव करून त्याने हे मोठे यश संपादन केले.यासाठी "आकार"जिम्नॅस्टिक्स बापगाव या अँकेडमीचे मोलाचे मार्गदर्शन त्याला मिळाले. शिवसेनेचे गटनेते व जि.पी.पारसीक सहकारी बँकेचे उपाध्यक्ष प्रकाश पाटील व शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र पालवी सर सह विद्यार्थ्यांनीं नागरीकांनी चिराग यांस पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

कल्याण भारत स्काऊट गाईड आणि जिल्हा परिषद शाळा भाल यांच्या संयुक्त विद्यमाने

# भाल जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : जिल्हा परिषद शाळा भाल येथे कल्याण भारत स्काऊट गाईड स्थानिक संस्था यांचेमार्फत लोकमान्य टिळक आणि क्रांतिकारक चंद्रशेखर आझाद यांच्या जयंतीचे औचित्य साधून वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सचिव ओक हायस्कूल कल्याणचे मुख्याध्यापक दिलीप तडवी, ठाणे जिल्हा एडीसी जगन्नाथ सपकाळे, ट्रेनिंग कौन्सिलर व मोहिंदरसिंग काबलसिंग हायस्कूलचे स्काऊटर दशरथ आगवणे, ट्रेनिंग कौन्सिलर सिध्दार्थ विद्या मंदिर कल्याण पूर्व स्काऊटर प्रविण खाडे, गणेश विद्या मंदिरचे स्काऊटर सुरेश गभाले, मुथा हायस्कूलच्या गाईडर जयमाला सपकाळे उपस्थित होते.

सोबत शिक्षकेतर कर्मचारी सोनुसिंग राठोड, निलेश इंगळे तसेच मोहिंदरसिंग काबलसिंग हायस्कूलच्या गाईड श्रेया गायकवाड, दिव्या सोनवणे, अनया गायकवाड, पूर्वा निके व स्काऊट जिवांशू मुकादम उपस्थित होते. शाळेच्या सांस्कृतिक हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित करून उपस्थित पाहुण्यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्व पटवून दिले तसेच विद्यार्थ्यांना उत्साही ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या आरोळ्या व टाळ्या वाजविणे शिकवले. तसेच वृक्ष लागवड व संवर्धन काळाची गरज आहे तसेच मानवी जीवनात वृक्षांचे महत्व खूप आहे हे पटवून दिले.

> या कार्यक्रमामध्ये उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्व पटवून दिले तसेच विद्यार्थ्यांना उत्साही ठेवण्यासाठी विविध प्रकारच्या आरोळ्या व टाळ्या वाजविणे शिकवले.

शाळेच्या मुख्याध्यापिका विजया आगवणे यांनी आभारप्रदर्शन केले व जि. प. शाळा भालची वृक्षारोपण कार्यक्रमासाठी निवड केल्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उपक्रमशील शिक्षिका संगिता निळे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे व्यवस्थापन ज्येष्ठ शिक्षिका प्रतिभा मडावी यांनी केले. कार्यक्रम पार पाडण्यासाठी संतोष मोहिते यांचे योगदान लाभले. शाळेच्या प्रांगणात कंपाऊडच्या शेजारी खड्डे खणून हापूस आंबा, जांभूळ, काटेसावर पिंपळ, वड, चिंच, करंज अशा प्रकारच्या भारतीय वृक्षांची लागवड करण्यात आली. तसेच दि.१ जून २०२१ रोजी लावलेल्या वृक्षाचे संवर्धन केल्याबद्दल संस्थेने शाळेने आभार मानले.

प.पू.स.रमणनाथजी महाराज संजीवन समाधी ट्रस्ट
भोगावती नगर (तानसा), ता. शहापूर, जि.ठाणे



मृत्यू म्हणजे गतजीवनाचा परमेश्वराला हिशोब देण्याचा पवित्र दिवस. परमेश्वर विचारेल - मी तुम्हाला डोळे दिले होते, त्यांचे तुम्ही काय केले? मी तुम्हाला कान दिले होते, त्यांचे तुम्ही काय केले? तुम्हाला शरीर व मन दिले, त्यांचा तुम्ही कोणता उपयोग केला? या हिशोबात जर गडबड झाली तर घबराट होणारच. सामान्य इन्कम टॅक्स ऑफिसरला हिशेब द्यायचा असला तर माणूस घाबरतो आणि देवाची प्रार्थना करतो की, मी निरनिराळी वही खाते ठेवली आहेत; आपले लक्ष असू द्या. एक वर्षाचे हिशोब देण्यात इतकी घबराट होते तर साऱ्या आयुष्याचा हिशोब देण्यात काय दशा होईल? देवाने आपल्याला जे दिले आहे त्याचा हिशोब द्यावाच लागेल..

गुरूमाऊली - प.पू.स.अलोकनाथजी महाराज

# वडखळ नाक्यावरील खड्ड्यांमुळे अपघातांचा धोका वाढला



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : पेण तालुक्यातील वडखळ येथे पावसाळयात दरवर्षी खड्डयांचा सामना करून रस्त्यावरून प्रवास करावा लागतो याची प्रचिती यावर्षीही दिसुनआली असून वडखळ नाक्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने खड्डे चुकवताना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

वडखळ ते कांदळेपाडा या दिड किलोमीटरच्या अंतरापर्यंत सहा सात वर्षांपूर्वी टाकलेले फ्लेवर ब्लॉकची खराब अवस्था झाली असल्याने चालकांना त्याचा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच बोरीफाटा ते वडखळ एसटी बस स्थानकापर्यंत डांबरीकरणाचा रस्ता बनवण्यात आला होता मात्र सदरच्या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडल्याने वाहन चालकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे अपघातांचा धोकाही निर्माण झाला आहे गेल्या दीड महिन्यापासून पडलेल्या या खड्डयांमुळे संबंधित खात्याने दुर्लक्ष केले असून खड्डे बुजवण्याचा मुहूर्त शोधतात की काय असा प्रश्न स्थानिक नागरिकांना व प्रवाशांना पडला आहे. या खड्डयांमधून प्रवास करताना दुचाकी वाहन चालकांचे अपघाताचे प्रमाण वाढले असल्याने पडलेल्या खड्डयात गाड्या चालवताना कसरत करावी लागत आहे त्यामुळे कुर्म गतीने वाहन चालवणं वाहनामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. सदरचे पडलेले खड्डे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन लवकरात लवकर बुजवण्यात अशी मागणी स्थानिक नागरिक व प्रवास करून होत आहे.

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ताच्या वृत्ताची रस्ते महा मंडळाकडून दखल




कल्याण शिळफाटा रोडवरील सनई बँक्वेट हॉल जवळील पंढरपूर चहा समोरच्या गटारावरील स्लॅब गायब झाल्याने मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशी माहिती जीवनदीपच्या १४ जुलैंच्या अंकात छापून आली होती.त्याची महापालिका आणि MSRDC ने दखल घेऊन २३ जुलैंच्या रात्री याठिकाणी स्लॅब बसवून नागरिकांच्या मागणीची पूर्तता केली

रायगड जिल्ह्यातील

# डाक विभागात डिजिटल उत्क्रांतीची सुरवात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : भारत सरकारच्या डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधामध्ये मोठे बदल घडवून आणण्याचे सरकारने ठरविले आहे. त्याकरता डाक विभागात IT 2.0 या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. या प्रणालीमुळे डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणारी सेवा ही अचूक, जलद व ग्राहकाभिमुख होईल.

या IT 2.0 प्रणालीची अंमलबजावणी ही दि. 05 ऑगस्ट 2025 रोजी रायगड जिल्ह्यातील सर्व डाक कार्यालयात (प्रधान डाकघर , उपडाकघर, शाखाडाकघर) होणार आहे. याकरिता Data Transfer ही अत्यंत महत्वाची प्रक्रिया असते जी दि. 04 ऑगस्ट 2025 (सोमवार) रोजी केली जाईल. या कारणांमुळे रायगड जिल्ह्यातील डाक कार्यालयासंबधित सर्व कामे ही दि. 04 ऑगस्ट 2025 (सोमवार) रोजी बंद राहतील. सर्व ग्राहकांनी त्यांची डाक कार्यालयासंबधित जी काही तातडीची कामे आहेत. दि. 02 ऑगस्ट 2025 पर्यंत पूर्ण करून घ्यावीत. ग्राहकांच्या हितासाठी व त्यांना अचूक, जलद व ग्राहकाभिमुख सेवा मिळावी याच उद्देशाने हे सर्व प्रयत्न केले जात आहेत. सर्व ग्राहकांनी याची कृपया नोंद घ्यावी व सहकार्य करावे.

# अतिरिक्त आयुक्तांच्या आश्वासनानंतर रिपब्लिकन सेनेचे उपोषण मागे



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रिपब्लिकन सेनेच्या कार्यकर्त्यांचे विविध मागणीसाठी गेल्या तीन दिवसांपासून कल्याण डोंबिवली महानगरपालिका मुख्यालयाबाहेर आमरण उपोषण चालू होते. त्यामध्ये प्रामुख्याने कल्याण शहर अध्यक्ष दामू काऊतकर, उपाध्यक्ष सुंदर काऊतकर व सहकारी यांनी सहभाग घेतला होता. मध्यरात्री एका उपोषणकर्त्यांची प्रकृती खालावली असता रुक्मिणीबाई रुग्णालयाचे डॉक्टर तपासणी साठी आले असता उपोषणकर्तांनी तपासणी करण्यास विरोध दर्शवला. या उपोषणाची दखल घेत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी रिपब्लिकन सेनेच्या शिष्टमंडळांना बोलावले.

रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांना कल्याण डोंबिवली जिल्हाध्यक्ष आनंद नवसागरे फोनद्वारे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांना चर्चा करून दिल्यानंतर या मागण्यांची सूचना व त्यांची अंमलबजावणी करण्याचे आश्वासन प्रशासनातर्फे देण्यात आले. या प्रमुख मागण्यांमध्ये कल्याण मधील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्टेशनजवळील उद्यानाचे विस्तारीकरण व दर्जेदार स्मारक बाधून देण्याचा आराखडा लवकरात लवकर जाहीर करणे, गोविंदवाडी बायपास मधील रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली तोडण्यात आलेल्या गोरगरीब १२० कुटुंबांचे पुनर्वसन करणे, कल्याण डोंबिवलीतील रुक्मिणीबाई रुग्णालय व शास्त्रीनगर सामान्य रुग्णालयातील होणाऱ्या रुग्णाची गैरसोय, तज्ञ डॉक्टरांचा अभाव, रुग्णालयात जेनरिक मेडिकलची असुविधा अशा विविध मागण्या बैठकीत करण्यात आल्या. सुमारे एक तास मागण्यांवर चर्चा करीत हे प्रश्न मार्गी लावण्याचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे व उपायुक्त रमेश मिसाळ यांनी लेखी आश्वासन दिले. लेखी आश्वासनानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.

# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांनी परदेशात शिष्यवृत्तीसाठी अर्ज सादर करावेत - समाजकल्याण विभागाचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : अल्पसंख्यांक विकास विभाग अंतर्गत अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांकरीता परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सन 2025-26 परदेशामध्ये उच्च शिक्षणासाठी मिळावयाच्या परदेश शिष्यवृत्ती निवडीसाठी सन सन 2025-26 करिता पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत असून या योजनेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थानी अर्ज सादर करावेत असे, आवाहन सहाय्यक आयुक्त समाजकल्याण सुनील जाधव यांनी केले आहे.

योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अल्पसंख्याक समुदयातील घटकतील असावा. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी 35 वर्षे च पीएचडीसाठी 40 वर्षे ही कमाल वयोमर्यादा असेल. विद्यार्थ्यांच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाखापेक्षा जास्त नसावे (विवाहित महिला उमेदवारांनी पतीकडील कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्नाचा दाखला देणे आवश्यक आहे. जर विवाहित महिला उमेदवार विधवा, घटस्फोटीता असून वडीलांकडे वास्तव्यास असल्यास महिला उमेदवाराने वडीलांकडील कुटुंबाच्या उत्पन्नानुसार अर्ज केल्यास तरी कायदेशीर कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे). पीएचडीसाठी 4 वर्षे किंवा प्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा कालावधी यापेक्षा कमी असेल तो तथापि कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा कमी नसावा. परदेशी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दोन वर्ष कालावधीचाच MBA अभ्यासक्रम अनुज्ञेय राहील. शिष्यवृत्ती द्यावयाच्या एकूण जागेपैकी 30 टक्के जागांवर मुलीची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. जर त्याप्रमाणात मुलींचे प्रवेश अर्ज प्राप्त न झाल्यास त्या जागेवर मुलांची गुणवत्तेनुसार निवड करण्याचे अधिकार निवड समितीला राहतील. एकाच कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलांना परदेश शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल त्यापेक्षा जास्त मुलांना परदेश शिष्यवृत्ती लागू राहणार नाही. पदव्युत्तर पदवी किंवा पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रमासाठी पदवी परिक्षेत व पीएचडीसाठी पदव्युत्तर परीक्षेत किमान 55 टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही पदवी किंवा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम त्याने अर्जाच्या दिनांकाला उतीर्ण केलेला असावा. परदेशातील शिक्षण संस्था ही जागतीक क्रमवारीत (QS World University Rank) 200 च्या आत असावी,

सदरील वेबसाईटवरुन अर्ज डाऊनलोड करुन तो परिपूर्ण व आवश्यक त्या सुस्पष्ट व वाचनीय कागदपत्रासह दि. 01 ऑगस्ट 2025 पर्यंत सायंकाळी 6.15 वाजेपर्यंत https://fs.maharashtra.gov.in, या वेबसाईट वर ऑनलाईन भरुन त्याची प्रिट, समक्ष किवा पोष्टाने समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च रोड, पुणे-411001 येथे सादर करावी. सदर जाहिरातीला मुदतवाढ देणे किंवा निकषात बदल करण्याचे अधिकार शासनाकडे असतील अर्जाचा नमुना व अधिक सविस्तर माहितीसाठी शासनाच्या www.maharashtra.gov.in, या संकेतस्थळावरील ताज्या घडामोडी या लिंकवर जाऊन भेट द्यावी.

# 'शिवकालीन रणरागिणी' विषयावर निबंध लेखन स्पर्धा



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात अनेक तेजस्विनी स्त्रियांनी समाज, कुटुंब, युद्धनीती, राज्यकारभार आणि संस्कृतीमध्ये अतुलनीय योगदान दिले. या स्त्रीशक्तीचा अभ्यास, जागर आणि अभिमान व्यक्त व्हावा, यासाठी "श्री शिवाजी ज्ञानपीठ (इंटरनॅशनल) संस्था" आणि "मराठी साहित्य व कला सेवा" यांच्या संयुक्त विद्यमाने एक राज्यस्तरीय निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा विषय शिवकालीन रणरागिनी असा असून निबंध पाठवण्याची अंतिम तारीख २५ ऑगस्ट २०२५ आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील विद्यार्थी, अभ्यासक, गृहिणी, लेखक आणि साहित्यप्रेमींना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे. १००० ते १५०० शब्दमर्यादा असून, स्पर्धा खुल्या गटात होणार आहे. विजेत्यांना प्रथम क्रमांकासाठी रोख रक्कम रुपये ५,०००/-, द्वितीय क्रमांकासाठी ३,०००/- आणि तृतीय क्रमांकासाठी २,०००/-, सन्मानचिन्ह आणि सर्व सहभागींना प्रमाणपत्र मुंबई येथे १५ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमात देण्यात येईल. स्पर्धेची नियमावली आणि अधिक माहितीसाठी marathisahityavkalaseva@gmail.com किंवा WhatsApp क्रमांक ९९८७७४६७७६ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# जनसंवादाच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी सोडवाव्यात

## - महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता मुंबई : महसूल विभागाचे काम गतिमान, पारदर्शक आणि लोकाभिमुख होण्यासाठी विभागातील अधिकाऱ्यांनी नागरिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या अडचणी जाणून घ्याव्यात. जनसंवाद, लोकशाही दिन आदी माध्यमातून त्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करावा, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री श्री.बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला. यावेळी मंत्रालयातील अधिकाऱ्यांसह रायगड जिल्ह्यातील महसूल अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

मंत्री श्री.बावनकुळे म्हणाले, राज्य शासनाच्या 150 दिवसांच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये रायगड जिल्हा प्रशासन मागे राहणार नाही याची दक्षता घ्यावी. शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमित करुन लाभार्थ्यांना घरांसाठी पट्टे उपलब्ध करुन द्यावेत. नवीन वाळू धोरण आणि मार्गदर्शक सूचनांनुसार वाळू उपलब्ध करुन द्यावी. भूमि अभिलेख विभागाच्या आधुनिकीकरणासाठी जिल्हा नियोजनच्या निधीमधून खर्च करण्यात यावा. पाणंद रस्त्यांना क्रमांक देऊन दुतर्फा वृक्ष लागवड करण्यात यावी. लोकअदालत सारख्या माध्यमांतून अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावण्या येत्या तीन महिन्यात पूर्ण कराव्यात. याचबरोबर जिवंत सातबारा, तुकडेबंदी, शेतरस्ता, भोगवटादार 2 मधून 1 मध्ये करण्याची तसेच आकारी पड जमिनीची प्रकरणे, स्वामित्व योजनेचा लाभ देणे आदी कामे देखील कालमर्यादेत मार्गी लावावीत, असे निर्देश त्यांनी दिले. रायगड जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील महसूल अधिकाऱ्यांनी यावेळी सुरू असलेल्या विविध कामांचा अहवाल सादर केला.

> रायगड जिल्ह्यातील महसूल विभागाशी संबंधित कामांचा आढावा मंत्री श्री.बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत घेतला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN, printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*